# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२६** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:- १३८** **दिनांक :- ०७/०८/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प विभाग/१२२/२०२४ दि.०२/०८/२०२४

३. उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.०२/०८/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त (बांधकाम) यांचा दि.०२/०८/२०२४ चा अभिप्राय

५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०२/०८/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७४ नुसार मलनिस्सारण जोडणी सुविधेची कामे करणेसाठी नळ कारागीरांनी आकारावयाच्या फी ची निश्चिती करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधिल प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रात अमृत १.० अंतर्गत झोन क्रं.०१ शिवाजी नगर परीसर व झोन क्रं.०२ जुना गावठाण परीसर या क्षेत्रात मलनिस्सारण योजनेच्या मलवाहीनींची कामे पुर्ण करण्यात आलेली असून या भागांतील पाणी शुध्दीकरणासाठी ४८ दश लक्ष क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र तयार करुन कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

सदस्थितीत विजपुरवठा जोडणी पूर्ण होवून मलप्रक्रिया केंद्र कार्यान्वित झालेले असल्याने तातडीने घरांची मलनिस्सारण जोडणीची कामे हाती घेण्याची आवश्यकता आहे. तरी सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७४ नुसार नळ कारागीर यांनी आकारावयाची फी निश्चितीचे अधिकार आहे. त्यानुसार खालील प्रमाणे सन-२०२३-२४ च्या दरसूचीनूसार फी निश्चीत करणेस मान्यता मिळावी.

(खालील दर साहीत्य पुरवठा, जोडणी, सर्वसाधारण खोदकाम व जी एस टी करांसह आहेत)

| | |
|---|---|
| पी.व्ही.सी. ७५ मी.मी. / ४ के.जी. व्यासाची जोडणी करणे | रु.२५८ प्रति मीटर |
| पी.व्ही.सी. ९० मी.मी. / ४ के.जी. व्यासाची जोडणी करणे | रु.३२८ प्रति मीटर |
| पी.व्ही.सी. ११० मी.मी. / ४ के.जी. व्यासाची जोडणी करणे | रु.४०७ प्रति मीटर |
| इन्टरसेप्टींग सिवर ट्रॅप बसविणे (१००X१५०) मीमी | रु.७१४ प्रति नग |

वरील दरांत परीस्थितीनुरुप बदल जागेवरील मालमत्तेच्या स्वरुपानुसार होणे अपेक्षित आहेत याबाबत मालमत्ताधारकांनी सुचकतेने आवश्यकतेनुसार खात्री करून परवानाधारक नळ कारागीरांना फी ची अदायगी करावी या सुचनेनुसार वरील प्रमाणे फी व आकार नळ कारागीरांसाठी निश्चित करणेस व वरील विहीत सर्वसाधारण कामांसाठी या व्यतिरीक्त फी स्विकारता येणार नाही याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७४ अन्वये विहीत करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

ज.श.म.न.पा.,जळगाव
प्रकल्प विभाग
आवक क्र. ९८५
दि.०७/०८/२०२४

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

(ज्ञानेश्वर ढेरे)
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**